# प्रेसनोट

## कृषि विभागाकडील उपलब्ध असलेला टोल फ्री क्रमांक ०७१५२-२५००९९ चा वापर पिक कर्ज सुरळीतपणे करणेसाठी

जिल्हयामध्ये खरीप हंगामात शेतक-यांना बियाणें वेळेवर उपलब्ध होणेसाठी आणि रास्त भावात गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध होणेसाठी कृषि विभाग राज्यस्तर व जिल्हास्तरावर टोल फ्री क्रमांक ०७१५२-२५००९९ हा देण्यात आलेला आहे. या टोल फ्री क्रमांकाद्वारे शेतक-यांचा कृषि विभागाशी सरळ संपर्क होणार आहे.

सद्यापरिस्थीतीत जिल्हयामध्ये सहकारी बँकेमार्फत पिक कर्ज मिळणेसाठी काही तांत्रिक अडचणी येत आहेत. राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. याबाबत शासनाने पुर्नगठण करण्याचे आदेश दिलेले आहेत. मात्र बँक स्तरावरती काही पात्र शेतक-यांना कर्ज मिळणेसाठी काही प्रमाणात अडचणी येतात व त्या त्यांना तालुका व जिल्हास्तरावर मांडाव्या लागतात. यामध्ये शेतक-यांचा वेळ व आर्थिक फटका बसतो. तसेच यामुळे शेतक-यांमध्ये नाराजी निर्माण होते. म्हणून शेतक-यांच्या सोयीसाठी कृषि विभागामार्फत उपलब्ध असलेला टोल फ्री क्रमांक ०७१५२-२५००९९ चा वापर शेतक-यांना सुरळीत कर्ज उपलब्ध होणेसाठी तसेच पात्र शेतक-यांच्या रास्त अडचणी संबंधीत बँक जिल्हा प्रतिनिधी व इतर संबंधीत अधिका-यांकडे पोहोचवूण त्याचप्रमाणे या अडचणीबाबत मा. जिल्हाधिकारी , वर्धा यांना अवगत करुन वेळोवेळी जिल्हास्तरावर होणा-या बँक समन्वय सभेमध्ये बँकांना सुचना देणे सोयीचे होणार आहे. यासाठी कृषि विभाग जिल्हापरिषद , वर्धा येथे स्वतंत्र रजिस्टर ठेवून त्याच्या नोंदी घेणे व तालुका स्तरावरील अधिका-यांना तसेच संबंधीत बँकेला प्राप्त अडचणी पाठवूण पिक कर्ज वितरणाला गती देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

यासाठी उपरोक्त टोल फ्री क्रमांकाचा वापर जिल्हयातील सर्व पिक कर्जासाठी पात्र शेतक-यांनी करावा असे आवाहन मा. श्री आशुतोष सलिल , जिल्हाधिकारी , वर्धा हे करीत आहेत.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**वर्धा**